धान बोनससाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा; मुख्यमंत्र्यांचे कार्यवाहीचे निर्देश

धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी ₹२० हजार बोनस देण्याची आ. सुधीर मुनगंटीवार यांची आग्रही मागणी; वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट

आ.मुनगंटीवार यांचा विधानसभेपासून शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा; प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे आवश्यक कार्यवाहीचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

मुंबई : धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी ₹२० हजार बोनस मिळावा, यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी पुन्हा एकदा शासनस्तरावर पाठपुरावा केला आहे. विधानसभेत हा प्रश्न ठामपणे मांडल्यानंतरही त्यांनी त्याचा सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला असून, मुंबई येथील वर्षा शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेऊन धान बोनसची आग्रही मागणी केली . आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

धान उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या वाढत्या भारातून दिलासा मिळावा, त्यांच्या मेहनतीला योग्य आर्थिक आधार मिळावा आणि धान उत्पादकांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने आ. सुधीर मुनगंटीवार यांनी प्रतिहेक्टरी ₹२० हजार बोनसची मागणी केली आहे. शेतकऱ्याच्या घामाचे मोल केवळ बाजारभावातून नव्हे, तर शासनाच्या आधारातूनही अधोरेखित झाले पाहिजे, अशी त्यांची भूमिका आहे.या प्रश्नाची सुरुवात विधानसभेपासून झाली. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत धान उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी प्रभावीपणे मांडत धान बोनसचा प्रश्न शासनाच्या निदर्शनास आणून दिला. सभागृहात विषय मांडल्यानंतरही ते त्यावर थांबले नाहीत. संबंधित विभाग, शासनस्तर आणि निर्णय प्रक्रियेपर्यंत त्यांनी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला. त्याचाच पुढचा टप्पा म्हणून आज त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन शेतकऱ्यांच्या मागणीचा पुनरुच्चार केला.

धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी प्रतिहेक्टरी ₹२० हजार बोनस देण्याचा निर्णय झाल्यास त्यांच्या वाढत्या उत्पादन खर्चाचा काही प्रमाणात भार हलका होण्यास मदत होईल, तसेच खरीप हंगामात धान उत्पादनासाठी मेहनत घेणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ मिळेल. विशेषतः धान उत्पादनावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या विदर्भातील शेतकऱ्यांसाठी हा विषय महत्त्वाचा आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या मागणीची दखल घेत प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग यांच्याकडे आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे धान बोनसच्या मागणीबाबत शासनस्तरावर पुढील कार्यवाहीला आता गती मिळणार आहे.

धान उत्पादक शेतकरी अत्यंत मेहनतीने पीक घेतो. वाढता उत्पादन खर्च आणि विविध अडचणींच्या पार्श्वभूमीवर त्याला शासनाचा आधार मिळणे आवश्यक आहे. म्हणूनच प्रतिहेक्टरी ₹२० हजार बोनसची मागणी मी विधानसभेत मांडली आणि त्यानंतरही सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला. आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन पुन्हा ही मागणी मांडली. त्यांनी संबंधित विभागाला कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. धान उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळावा, हीच आपली भूमिका आहे, असे आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.विधानसभेपासून सुरू झालेला हा पाठपुरावा आता मुख्यमंत्री स्तरापर्यंत पोहोचला असून, धान उत्पादक शेतकऱ्यांच्या मागणीवर शासनाच्या पुढील निर्णयाकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्र विधानसभा

सुधीर मुनगंटीवार
विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक : ८५५४/सप्टें/26

दिनांक : २२.०९.२०२६

प्र-म-अ-व-गा-पु
कार्यवाही

प्रति,
मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई.

सप्रेम वंदेमातरम्...!!

विषय : धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी रु. २०,००० बोनस देण्याबाबत.

मा. महोदय,

महाराष्ट्रातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत मी सातत्याने शासनाचे लक्ष वेधत आहे. विधानसभेच्या अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडून तसेच विधान भवनात सातत्याने पाठपुरावा करून, प्रत्यक्ष भेटी व पत्रव्यवहाराच्या माध्यमातून धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी रु.२०,००० बोनस देण्याची मागणी मी सातत्याने शासनासमोर मांडत आहे.

धान उत्पादक शेतकऱ्यांचा वाढलेला उत्पादन खर्च, मजुरी, खते, बियाणे, कीटकनाशके, डिझेल तसेच नैसर्गिक संकटांमुळे होणारे नुकसान यामुळे शेतकऱ्यांवर मोठा आर्थिक भार पडत आहे. धान पिकावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळण्यासाठी बोनसची आवश्यकता आहे.

आज धान उत्पादक शेतकरी आपल्या न्याय्य मागणीसाठी आंदोलन करीत आहेत. शेतकऱ्यांना आपल्या हक्काच्या मागणीसाठी रस्त्यावर उतरावे लागणे ही निश्चितच भूषणावह बाब नाही. शेतकऱ्यांच्या अडचणी आंदोलनाची वेळ येण्यापूर्वीच शासनाने संवेदनशीलतेने समजून घेऊन त्यावर सकारात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

त्यामुळे आता धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी रु.२०,००० बोनस देण्याचा निर्णय तातडीने घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी माझी आग्रहाची मागणी आहे.

चंद्रपूरसह पूर्व विदर्भातील असंख्य धान उत्पादक शेतकऱ्यांचे जीवनमान आणि कुटुंबाचे अर्थकारण धान पिकावर अवलंबून आहे. त्यामुळे या निर्णयामुळे वाढलेल्या उत्पादन खर्चाचा भार काही प्रमाणात कमी होऊन शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आधार मिळेल.

तसेच बोनसचा लाभ देताना शासनाच्या निकषांनुसार पात्र असलेला एकही धान उत्पादक शेतकरी या लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

शेतकऱ्यांच्या मागणीला आंदोलनाची दिशा घेण्यापूर्वीच शासनाने सकारात्मक प्रतिसाद देऊन प्रति हेक्टरी रु.२०,००० बोनस जाहीर करावा, ही नम्र विनंती.

कार्यकवाहीची रुपरेषा मला कळविण्यात यावी, ही विनंती

सविनय धन्यवाद.

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रतिलिपी,
१. श्री. बंडू गौरकार, सदस्य महाराष्ट्र राज्य कृषीमुल्य आयोग, मुंबई
२. श्री. रवी चहारे, अध्यक्ष, भाजपा किसान मोर्चा, चंद्रपूर महानगर, चंद्रपूर

!! वृक्ष लावा, वृक्ष जगवा !!
पत्ता :'भाग्यश्री' गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी क्र. 07172-252582 (O), 256069 (H) 9552799608 (W)

Scanned with OKEN Scanner